# अंदाज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

सत्यमेव जयते

**(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२१-२०२२ भाग-२ या अर्थसंकल्प प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतुदीची बांधकामनिहाय विगतवारी (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ या परिशिष्टाद्वारे दर्शविण्यास मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल)**

# पहिला अहवाल

**(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक मार्च, २०२१ रोजी सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**विधान भवन, मुंबई.**

**मार्च, २०२१**

# अंदाज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२१-२०२२ भाग-२ या अर्थसंकल्प प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतुदीची बांधकामनिहाय विगतवारी (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ या परिशिष्टाद्वारे दर्शविण्यास मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल)**

# पहिला अहवाल

**(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक मार्च, २०२१ रोजी सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**विधान भवन, मुंबई.**

**मार्च, २०२१**

# <u>(तीन)</u>

# <u>अंदाज समिती</u>

# <u>(२०२०-२०२१)</u>

**<u>समिती प्रमुख</u>**

१) **श्री.रणजित कांबळे, वि.स.स.**

**<u>सदस्य</u>**

२) श्री. चिमणराव पाटील, वि.स.स.

३) श्री. सदा सरवणकर, वि.स.स.

४) श्री. संजय गायकवाड, वि.स.स.

५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

६) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

७) श्री. प्रकाश सोळंके, वि.स.स.

८) श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स.

९) श्री. दिलीप मोहिते-पाटील, वि.स.स.

१०) श्री. माणिकराव कोकाटे, वि.स.स.

११) श्री. कुणाल पाटील, वि.स.स.

१२) श्री. अमित झनक, वि.स.स.

१३) श्री. धीरज देशमुख, वि.स.स.

१४) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

१५) श्री. संभाजी पाटील-निलंगेकर, वि.स.स.

१६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

१७) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

१८) श्री. राम कदम, वि.स.स.

१९) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

२०) श्री. रवी राणा, वि.स.स.

२१) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.

२२) श्री. प्रकाश आवाडे, वि.स.स.

२३) श्री. रईस शेख, वि.स.स.

२४) श्री. विलास पोतनीस, वि.प.स.

२५) श्री. दुष्यंत चतुर्वेदी, वि.प.स.

२६) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स

२७) डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स.

२८) श्री. सुजितसिंह ठाकूर, वि.प.स.

२९) श्री. निलय नाईक, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

३०) श्री.बळवंत वानखडे, वि.स.स.

३१) श्री. कपिल पाटील, वि.प.स.

३२) श्री.विनायकराव मेटे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**(१)** श्री.राजेन्द्र भागवत, सचिव,

**(२)** श्री.विलास आठवले, उप सचिव,

**(३)** श्री.विजय कोमटवार, अवर सचिव,

**(४)** श्री.दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

# अ नु क्र म णि का


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १) | प्रस्तावना | |
| २) | अहवाल | |
| ३) | समितीचे अभिप्राय व शिफारशी | |
| ४) | परिशिष्ट - एक<br>(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२१-२०२२ भाग-२ या अर्थसंकल्प प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतुदीची बांधकामनिहाय विगतवारी (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ या परिशिष्टाद्वारे दर्शविण्यास मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल) | |
| | परिशिष्ट - दोन<br>(समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त) | |

# प्रस्तावना

मी अंदाज समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन सन २०२१-२०२२ या अर्थिक वर्षापासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या बांधकामांची बांधकाम निहाय यादी, तरतूदीची विगतवारी अर्थसंकल्पीय अंदाज भाग-3 च्या नविन परिशिष्टाद्वारे दर्शविण्यासाठी अंदाज समितीची मान्यता मिळण्याकरिता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने पाठविलेल्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

महाराष्ट्र विधानसभा नियम २०८ (१) अन्वये "अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा असतो तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात येईल" अशी नियमात तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र विधानसभा नियम २०९ (क) अनुसार समितीकडे विचारार्थ आलेल्या वित्तीय प्रश्नावर सरकारला सल्ला देणे ही एक महत्त्वपूर्ण जबाबदारी अंदाज समितीकडे सोपविण्यात आलेली आहे. यापूर्वीही शासनाने अशा प्रकारच्या वित्तीय बाबी समितीकडे विचारार्थ पाठविल्या होत्या. यावरील अहवाल समितीने त्या त्या वेळी सभागृहास सादर केलेले आहेत.

सन २०२१-२०२२ या अर्थिक वर्षापासून पासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्प अंदाज भाग-२ या अर्थसंकल्प प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतुदीची बांधकामनिहाय विगतवारी (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या नविन परिशिष्टाद्वारे दर्शविण्यासाठी अंदाज समितीची मान्यता आवश्यक असल्याने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने समितीकडे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविला आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने अंदाज समितीकडे पाठविलेल्या उपरोक्त नविन परिशिष्टाच्या प्रस्तावासंदर्भात प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांची साक्ष घेतली. सदर प्रस्तावास समितीने मान्यता दर्शविली आहे.

समितीसमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून साक्ष दिल्याबद्दल श्री.श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांची समिती अत्यंत आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या वेळी आपला अमुल्य वेळ देऊन समिती सदस्यांनी ज्या आस्थेने व तत्परतेने हे काम पूर्ण करण्यास सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचे मन:पुर्वक आभार मानतो.

समितीने दिनांक मार्च, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर चर्चा केली व अहवाल संमत केला.

**विधान भवन**
मुंबई,
दिनांक मार्च, २०२१

**रणजीत कांबळे**
समिती प्रमुख
अंदाज समिती

# अहवाल

अंदाज समिती ही महाराष्ट्र विधानमंडळाची एक अत्यंत महत्त्वाची वित्तीय समिती आहे. अर्थसंकल्पीय अंदाज आणि पूरक अनुदानासाठीच्या मागण्यांची छाननी करण्यासाठी आणि असे अंदाज व मागण्या ज्या धोरणावर आधारित असतील त्या धोरणाशी सुसंगत असे काटकसरीचे उपाय सुचविण्यासाठी आणि अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र विधानसभा नियम २०८ (१) अन्वये अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा असतो तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात येईल अशी नियमात तरतूद आहे. Estimate Committee is authorized committee to suggest form of the budget. तसेच महाराष्ट्र विधानसभा नियम २०९ (१) (क) अन्वये अंदाज समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येतील अशा वित्तीय प्रश्नांवर सरकारला सल्ला देणे अशीही तरतूद केलेली आहे. कौल आणि शकधर यांच्या PRACTICE AND PROCEDURE OF PARLIAMENT या पुस्तिकेच्या सहाव्या आवृत्तीमधील पृष्ठ क्र.८७० वरील अंदाज समितीच्या कार्यपध्दतीमध्ये Whenever Government want to make any change in the format or the information to be given in the Budget papers on Demands for Grants, the matter is referred to the Committee for their recommendations असे नमूद करण्यात आले आहे. उपरोक्त नियमाच्या तरतुदीच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक ५ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या पत्रान्वये अर्थसंकल्प अंदाज भाग-२ या अर्थसंकल्प प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतुदीची बांधकामनिहाय विगतवारी (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या नविन परिशिष्टाद्वारे दर्शविण्यासाठी अंदाज समितीची मान्यता मिळण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला.

वित्त विभागच्या दि.२६.४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये, विधीमंडळामध्ये तसेच लोकलेखा समितीच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीतील चर्चेच्या वेळी विशिष्ट योजनांना जो निधी एकत्रितरित्या दाखविला जातो अशा योजनांवरील निधीची विभागणी कशी होते, तो कोणाकोणाला दिला जातो याबाबतची निश्चित अशी माहिती प्राप्त होत नसल्याने एकत्रित निधीची विभागणी देणेबाबत वेळोवेळी आग्रह धरण्यात येतो. उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने वित्त विभाग शासन परिपत्रक दि.२१/०८/२०१३ अन्वये तसेच नियोजन विभागाच्या दि. ११/६/२०१८ च्या परिपत्रकान्वये निधी अर्थसंकल्पीत करताना कामनिहाय तरतूदी दर्शविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, विभागाच्या भाग दोन-खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाजाचे अवलोकन केले असता, यामध्ये बांधकामविषयक निधी हा एकत्रितरित्या अर्थसंकल्पित करण्यात येतो व त्यामधून वसतिगृहे, निवासी शाळा इत्यादी मोठ्या प्रकारची बांधकामे हाती घेण्यात येतात. परंतू निधी अर्थसंकल्पीत करताना कामनिहाय निधीची आकडेवारी विधानमंडळास सादर केली जात नाही. त्यामुळे या एकत्रित निधीतून कोणती बांधकामे हाती घ्यावयाची आहेत व त्यांना किती निधी अंदाजित/अर्थसंकल्पित करण्यात येत आहे याची माहिती ज्ञात होत नाही. वरीलप्रमाणे अचूक अंदाजाशिवाय निधीची तरतूद विधानमंडळास सादर करणे ही बाब अर्थसंकल्प तयार करण्याच्या नियमांविरुध्द होईल व याच अनुषंगाने लोकलेखा तसेच अंदाज समितीने वरील आक्षेप घेतलेला आहे.

अर्थसंकल्पीय अंदाज भाग-२ यामध्ये केलेल्या तरतुदीची जिल्हानिहाय वर्गवारी किंवा बांधकाम/कामनिहाय वर्गवारी याची माहिती अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ या परिशिष्टाद्वारे विधानमंडळास सादर करण्यात येते. या अनुषंगाने विभागाच्या अर्थसंकल्प अंदाज भाग-२ या अर्थसंकल्प प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतूदीची बांधकामनिहाय विगतवारी (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ या परिशिष्टाद्वारे वेगळयाने दर्शविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र विधानसभा नियम क्र.२०८ अन्वये अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा आहे, तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. विभागाचे जिल्हा वार्षिक योजनेचे अर्थसंकल्पीय अंदाज हे "अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ परिशिष्ट - फ" या प्रकाशनाद्वारे विधानमंडळास सादर करण्यात येतात. सदर परिशिष्ट - फ विधानमंडळास सादर करण्यासाठी अंदाज समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यामुळे विभागाकडील बांधकामनिहाय तरतूदीची विगतवारी अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या नवीन परिशिष्टाद्वारे दर्शविण्यासाठी अंदाज समितीची तातडीने मान्यता घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

अर्थसंकल्पीय अंदाज भाग-२ यामध्ये केलेल्या तरतुदीची जिल्हानिहाय वर्गवारी किंवा बांधकाम/कामनिहाय वर्गवारी याची माहिती अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ या परिशिष्टाद्वारे विधानमंडळास सादर करण्यात येते. त्या अनुषंगाने या विभागाच्या अर्थसंकल्प अंदाज भाग-२ या अर्थसंकल्प प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतूदीची बांधकामनिहाय विगतवारी (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या नविन परिशिष्टाद्वारे वेगळ्याने दर्शविण्याबाबत वित्त विभागाने २६ एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्रान्वये या विभागास कळविले आहे. त्यानुषंगाने, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारितीत येणाऱ्या बांधकामांची बांधकामनिहाय यादी, तरतूदीची विगतवारी अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या नवीन परिशिष्टाद्वारे दर्शविण्यासाठी अंदाज समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अंदाज समितीने दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीच्या वेळी दिलेली माहिती खालील प्रमाणे आहे.**

समितीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सचिवांना प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी अशी विचारणा केली असता विभागाच्या सचिवांनी सदरहू प्रस्तावाबाबतची पार्श्वभूमी विदित करताना सगितले की सामाजिक न्याय भवनाची काही कामे आहेत. ठाणे येथे सामाजिक न्याय भवनाचे बांधकाम आहे. सामाजिक न्याय भवन बांधकाम, अकोला दोन कामे आहेत. मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह बांधकामाचा हेड आहे. त्यामध्ये कामे आहेत. रावेर जिल्हा जळगाव येथे वसतीगृहाचे बांधकाम आहे. शहादा जिल्हा नंदुरबार येथे मुलांच्या वसतीगृहाचे बांधकाम आहे. अंमळनेर जिल्हा जळगाव येथे मुलींसाठी शासकीय वसतीगृहाचे बांधकाम आहे. गंगाखेड परभणी वसतीगृहाचे बांधकाम आहे. कळमणुरी, हिंगोली जिल्ह्याच्या ठिकाणी बांधकाम आहे. मंगळुरपीर वाशिम जिल्ह्यात घाटपुरी, तालुका खामगाव शेगाव जिल्हा बुलढाणा वाशिम जिल्ह्याच्या ठिकाणी वसतीगृहाचे बांधकाम आहे. दहीवडी, जिल्हा सातारा, सोलापूर येथे चांबार खिंड, तालुका महाड जिल्हा रायगड येथे वसतीगृहाचे बांधकाम आहे. इ. अशी राज्यात सामाजिक न्याय विभागाची विविध बांधकामे आहेत. या बांधकामाचा तपशिल सद्य:स्थितीत देण्यात येत नाही. आतापर्यंत एका लेखाशिर्षामध्ये नियतव्यय दाखविला जात होता. पण प्रत्येक कामाचे तपशीलवार वर्णन नव्हते. बांधकामाची विगतवारी नव्हती. विगतवारी कामनिहाय दाखवावी अशी आम्हाला वित्त विभागाने सूचना केली होती. त्यासाठी कामनिहाय विगतवारी घेऊन प्रस्ताव समितीच्या मान्यतेसाठी समितीसमोर आणलेला आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, अगोदर नियतव्य अर्थसंकल्पात ठरले जात होते. त्यामध्ये वेगवेगळ्या कामाचे हेड दिले जात होते. या कामावर खर्च होणार आहे आणि नियतव्यय आपण ठरविला आहे. अर्थसंकल्पात मंजुरी मिळत असते. त्यात संबंधित कामाची संपूर्ण तपशिलवार माहिती दिली जायची. उक्त माहितीमध्ये वेगळे काय मागणार आहोत? वित्त विभागाची अपेक्षा काय आहे? ठोक रक्कम मुख्यलेखाशिर्षामध्ये घेतली जायची. आता त्याच लेखाशिर्षातील मुख्यलेखाशिर्षामध्ये आपण कामनिहाय (आयटमवाईज) माहिती देण्यात येणार आहे.

-------------------

# अभिप्राय व शिफारशी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा प्रस्ताव व त्याबाबत विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पात आतापर्यंत सामाजिक न्याय व विशेष सहायय विभागाच्या बांधकामासाठीचा नियतव्यय व खर्चाचे आकडे दर्शविण्यात येत होते. लोकलेखा व अंदाज समितीने घेतलेल्या अक्षेपानुसार वित्त विभागाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास त्यांच्या विभागाच्या अखत्यारित येत असलेल्या बांधकामाचा तपशिल स्वतंत्ररित्या परिशिष्टाद्वारे विधीमंडळास अर्थसंकल्पीय प्रकाशनासमवेत उपलब्ध करुन देण्यात यावा असे कळविले  होते. त्यानुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पापासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत करण्यात येणाऱ्या बांधकामांचा तपशिल बांधकाम निहाय केलेली तरतूद व झालेला खर्च यासह अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या परिशिष्ट - फ मध्ये उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास अंदाज समितीने मान्यता दर्शवून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने सन २०२१-२०२२ या अर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनासमवेत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या बांधकामाचे अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ चे स्वतंत्र परिशिष्ट देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेली कार्यवाही समितीस यथाशीघ्र अवगत करण्यात यावी,  अशी समितीची शिफारस आहे.

# परिशिष्ट - एक
# (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून प्राप्त झालेली माहिती)

# CIVIL BUDGET ESTIMATES
# अर्थसंकल्पीय अंदाज

## 2021-2022
## २०२१-२०२२

## PART III --- APPENDICES
## भाग तीन ----**परिशिष्टे**

### APPENDIX 'H',
परिशिष्ट "एच"

**DETAILS OF VARIOUS PROVISIONS FOR "WORKS" INCLUDED IN THE BUDGET ESTIMATES UNDER THE SOCIAL JUSTICE & SPECIAL ASSISSTANCE DEPARTMENT**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या "बांधकाम" संबंधिच्या निरनिराळ्या तरतुदींचा तपशील

**Presented to the Legislature under Article 202 (1) of the Constitution of India**

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०२ (१) अन्वये विधानमंडळास सादर

रू. हजारात ( Rs in Thousand)

| अ.क्र. **Sr.No.** | प्रधान शिर्ष, गौणशिर्ष, उपशिर्ष, तपशिलवार शिर्ष व बांधकामाचे नाव | अंदाजित किंमत Estimated Cost | मार्च, २०१९ पर्यंत झालेला खर्च **Expenditure upto March 2019** | अथसल्पीय अंदाज २०१९-२० **Budget Estimates 2019-20** | उर्वरित किंमत **Remaining Cost** | सन २०२०-२१ साठी तरतूद **Budget Estimates 2020-21** | **Major Head, Minor, Head, Detailed Head, and Name of the work** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

## पहिली बैठक

मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१
स्थळ :- विधान भवन, मुंबई.

**<u>उपस्थिती :</u>**

**समिती प्रमुख**

(१) श्री. रणजीत कांबळे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. सदा सरवणकर, वि.स.स.

(३) श्री. प्रकाश (दादा) सोळंके, वि.स.स.

(४) श्री. अमित झनक, वि.स.स.

(५) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

(८) श्री. विलास पोतनीस, वि.प.स.

(९) श्री. दुष्यंत चतुर्वेदी, वि.प.स.

(१०) डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स.

निमंत्रित सदस्य

(१) श्री. बळवंत वानखडे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.विजय कोमटवार, अवर सचिव

उपस्थित अधिकारी

श्री.श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग